**<u>ठळक बातम्या</u>**

- तंत्रज्ञानाचा वापर हत्यार म्हणून होता कामा नये, तर जनतेच्या कल्याणासाठी झाला पाहिजे असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री उद्यापासून दोन दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर/ नवी मुंबई विमानतळाचं करणार उद्घाटन

- मतदार याद्यांचं सखोल पुनरिक्षण देशभरात करण्यात येणार

**आणि**

- अमेरिकेत कालही अनुदान विधेयकावर सहमती न झाल्यानं शटडाऊन कायम

**<><><><><>**

तंत्रज्ञानाचा वापर हत्यार म्हणून नव्हे, तर जनतेच्या कल्याणासाठी झाला पाहिजे असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज मुंबईत सहाव्या ग्लोबल फिनटेक फेस्टचं उद्घाटन करताना बोलत होत्या. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कार्यक्षमतेत वाढ होते आणि भ्रष्टाचाराला आळा बसतो असं सांगतानाच त्यांनी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीचं उदाहरण दिलं. लाभार्थ्यांना हवं तिथे पैसा वापरण्याची संधी मिळाल्यामुळे बचत ठेवींमधे ४ लाख ३१ हजार कोटी रुपयांची भर पडली आहे असं त्या म्हणाल्या....

**होल्ड- बाईट-**

फिनटेक कंपन्यांनी उत्पन्न वाढ, अभिनव उत्पादनं, जोखीम व्यवस्थापन या मूलभूत क्षेत्रावर भर द्यावा, असं आवाहन अर्थमंत्री सीतारामन यांनी केलं.

यावेळी गिफ्ट सिटी इथं परदेशी चलन व्यवस्थापन यंत्रणेचा प्रारंभही यावेळी केला. या प्रणालीमुळे गिफ्ट सिटीत परदेशी चलनातले व्यवहार रिअल टाईममध्ये पूर्ण होतील, अशी माहिती त्यांनी दिली. सध्या यासाठी ३६ ते ५४ तास लागतात.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक जगासाठी वित्तीय उपलब्धता ही यंदाच्या फिनटेक महोत्सवाची संकल्पना आहे. प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे प्रधानमंत्री केयर स्टार्मर येत्या गुरुवारी या महोत्सवात सहभागी होणार आहेत. उद्योग क्षेत्रातले तज्ञ, धोरणकर्ते आणि नवोन्मेषकांशी ते यावेळी संवाद साधतील.

<><><><><>

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर उद्या भारत दौऱ्यावर येत आहेत. स्टार्मर यांची ही पहिलीच भारत भेट आहे. ९ ऑक्टोबर रोजी स्टार्मर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मुंबईत भेट घेतील आणि भारत-ब्रिटन द्विपक्षीय संबंधाचा आढावा घेतील. यावेळी दोन्ही नेते विविध उद्योगांच्या प्रमुखांशीही चर्चा करणार आहेत. तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत.

भारत आणि अमेरिकेमध्ये व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, संरक्षण आणि सुरक्षा, पर्यावरण आणि ऊर्जा, आरोग्य, शिक्षण अशा विविध क्षेत्रांबाबत दहा वर्षांच्या भागीदारीचं धोरण आखण्यात आलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. उद्या ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन करतील. येत्या डिसेंबर पासून या विमानतळावरुन उड्डाणांना सुरुवात होईल. मुंबई महानगरप्रदेशातला हा दुसरा विमानतळ असून यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरचा भार कमी होणार आहे. या विमानतळाची वार्षिक प्रवासी क्षमता ९ कोटी असेल.

आपल्या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी मुंबई मेट्रो-३ चं लोकार्पण करणार आहेत. शहराच्या वाहतूक व्यवस्थेतला हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. त्यानंतर प्रधानमंत्री, ‘मुंबई वन’, या भारताच्या पहिल्या एकात्मिक मोबिलिटी ॲपचं उद्घाटन करणार

आहेत. तसंच प्रधानमंत्री अल्पकालीन रोजगारक्षम उपक्रमाचं उद्घाटन करतील. हा उपक्रम राज्यातली चारशे तंत्रनिकेतन महाविद्यालयं तसंच दीडशे शासकीय तांत्रिक उच्च विद्यालयांमधे राबवला जाईल. तरुणांमधे रोजगारक्षमता वाढवण्यासाठी कौशल्यविकास करणं हा याचा हेतू आहे.

**<><><><><>**

इंडिया मोबाईल काँग्रेस २०२५ चं उद्घाटन उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत होणार आहे. बदलासाठी नवोन्मेष ही या चार दिवसांच्या मेळाव्याची संकल्पना आहे. दूरसंवाद आणि डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रात आत्मनिर्भरतेला प्रोत्साहन हा या कार्यक्रमाच्या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. या मेळाव्यात होणाऱ्या चर्चासत्रांमध्ये सिक्स जी परिसंस्था, सायबर सुरक्षा, उपग्रह दूरसंवाद, कृत्रिम बुद्धीमत्ता, दूरसंवाद उत्पादन इत्यादी विषयांवर विचारविनिमय केला जाईल. दरम्यान केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जबाबदारीने करण्यासाठी विश्वास आणि सुरक्षितता आवश्यक असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं 'ट्रस्ट अँड सेफ्टी फेस्टिवल ऑफ इंडिया' महोत्सवाला संबोधित करत होते.

आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थव्यवस्थांमध्ये परिवर्तन घडवेल, कामाच्या सवयी बदलेल, चांगल्या आरोग्यासाठी नवीन उपाय शोधेल आणि शिक्षणाची पोहोच वाढवेल, असं ते यावेळी म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी संतुलित दृष्टिकोन अंगिकारण्याची, तसंच नागरिकांची डिजिटल ओळख जपण्यासाठी सुरक्षेच्या प्रभावी उपायांची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याला आज २५ वर्ष पूर्ण झाली. सरकारचे प्रमुख या नात्याने गेली २५ वर्ष आपण आमूलाग्र बदलाचे साक्षीदार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यानिमित्त लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. आरोग्य, सामाजिक सुरक्षा, महिला, युवक आणि शेतकरी सक्षमीकरण, या क्षेत्रात सुरु केलेल्या कामाबरोबरच त्यांनी आत्मनिर्भरता या उद्दिष्टाला महत्त्व दिलं आहे.

**<><><><>**

मतदार यांद्यांच्या सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया देशभरात राबवण्यात येणार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी जाहीर केलं.  ते नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. देशभरात मतदारयाद्यांचं सखोल पुनरिक्षण करण्यासाठी निवडणूक आयोग तयारी करत असून याच्या तारखा निश्चित करून लवकर याची घोषणा करण्यात येईल, असं त्यांनी यावेळी सांगितलं. निवडणूक आयोगाने बिहारमधे सखोल पुनरिक्षणाची प्रक्रिया नुकतीच केली, यात ६९ लाख जणांचं नाव मतदार यादीतून वगळण्यात आलं. त्यानंतर बिहारमधे मतदारांची संख्या ७ कोटी ४३ लाख इतकी असल्याचं स्पष्ट झालं. मतदार यादी अधिक पारदर्शक करणं हे याचं उद्दिष्ट असल्याचं मुख्य आयुक्तांनी सांगितलं.

**<><><><>**

संरक्षण क्षेत्रातली आत्मनिर्भरता ही घोषणा आणि धोरणांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष कृतीमधे परावर्तित झाली असून त्याचा व्यापक परिणाम झाला आहे, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं संरक्षण नवोन्मेष संवाद कार्यक्रमात बोलत होते. आजच्या काळात युद्धामधे तंत्रज्ञानाचा वापर अधिक होत असून या बदललेल्या परिस्थितीची सरकारला जाणीव असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा नोंदी असलेल्यांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या शासन निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारकडून जबाब मागितला आहे. गेल्या २ सप्टेंबर रोजी हा शासन निर्णय जारी झाला होता.

**<><><><><>**

पाकिस्तान स्वतःच्या नागरिकांवर बॉम्ब हल्ले करत असून, पद्धतशीरपणे नरसंहार करत असल्याचं भारतानं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देताना म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांमधले भारताचे स्थायी प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश, ‘महिला, शांतता आणि सुरक्षा’ या विषयावर आयोजित खुल्या चर्चेत बोलत होते.

**<><><><><>**

अमेरिकेमध्ये सरकारी कामकाज चालवण्यासाठी निधी मंजूर कारण्याबाबतचं विधेयक अमेरिकन संसदेच्या वरिष्ठ सभागृहात काल मंजूर झालं नाही. डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन दोन्ही पक्षांनी ही कोंडी सोडवण्यासाठी दिलेल्या प्रस्तावाला मंजुरीसाठी आवश्यक असलेली ६० मतं मिळाली नाहीत. त्यामुळे अमेरिकेतलं सरकारी कामकाज सलग सातव्या दिवशी बंद राहिलं.

**<><><><><>**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी गोहाटी इथं इंग्लड आणि बांगलादेशच्या संघांमध्ये सामना होणार आहे. यापूर्वी झालेल्या सामन्यांमध्ये इंग्लंडने दक्षिण आफ्रिकेचा, तर बांगलादेशने पाकिस्तानच्या संघाचा पराभव करून, विश्वचषक स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे.

**//<><><><><>//**